# प्रकरण – 4 थे

## स्वा. दादासाहेब उंडाळकरांचे – सामाजिक कार्य

## स्वा. दादासाहेब उंडाळकरांचे सामाजिक कार्य

**प्रास्ताविक :-**

इंग्रजांचे महाराष्ट्रात आगमनाबरोबर सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनेही होऊ लागली होती. 19 वे शतक हे महाराष्ट्रात समाजसुधारणेचे शतक ठरले. समाजातील रुढी, परंपरा, अज्ञान, अंधश्रध्दा जातिभेद या विरुध्द समाज सुधारकांनी रणशिंग फुंकले. त्यात म. जोतिबा फुले, राजर्षि शाहू महाराज, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, महर्षि धोंडो केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंडबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील हे प्रमुख प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील जिल्हे व तालुके येथे सामाजिक कार्यकर्त्यांची परंपरा निर्माण झाली. या परंपरेच्या मालिकेत दादासाहेब उंडाळकरांना महत्वाचे स्थान आहे. त्यांना जरी त्यांच्या राजकीय व स्वातंत्र्य लढयातील कार्यामुळे प्रामुख्याने ओळखले जाते. तरी त्यांचे सामाजिक कार्यही महत्वपूर्ण आहे. ते म. फुल्यांचे सच्चे अनुयायी होते असे म्हणता येईल. दादांच्या सामाजिक कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

### 1. अस्पृश्योध्दाराचे कार्य

महाराष्ट्रात अस्पृश्यता ही वंशपरंपरेने चालत आलेली अत्यंत वाईट प्रथा होती. उच्च वर्णियाकडून अस्पृश्यांना अत्यंत हीन वागणूक दिली जात होती. समाज जीवनात त्यांना कोणतेही स्थान नव्हते. अस्पृश्यांना गावाच्या बाहेर रहावे लागे. दारिद्र्यातच त्यांचा जन्म होई व त्यातच त्यांचा अंत होई. उच्च वर्णियांची सेवा करणे एवढेच त्यांचे कर्तव्य होते. अत्यंत हीन कामे त्यांच्याकडून करवून घेतली जात. हा समाज अज्ञन व दारिद्र्यामध्ये पिचत पडलेला होता. वर्ण व्यवस्था हा हिंदू धर्माला लागलेला कलंक आहे. तो दुर करण्याचे कार्य म. जोतिबा फुले यांनी प्रथमता हाती घेतले. त्याच मालिकेत

दादासाहेब उंडाळकर यांचाही समावेश होतो.

सन 1930 सालापासून दादांनी आपल्या घरात एक अस्पृश्य नोकर ठेवला होता व अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे हे आपल्या कृतीने दाखवून दिले. 1 याबाबत त्यांना कृतिवीर म्हणता येईल.

ज्याप्रमाणे म. फुल्यांनी आपल्या अंगणातल्या हौदातील पाणी अस्पृश्य समाजाला पिण्यासाठी दिले. त्याचप्रमाणे दादांनी सुध्दा अनंक वेळा आपल्या घरातील धान्य व इतर वस्तू गावातील दलित समाजाला दिल्या. 2

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विषमतेवर आधारलेली समाज रचना नष्ट करण्यासाठी आपले सर्व आयुष्य पणाला लावले. जन्मावरुन प्राप्त होणारे नीच जीवन नष्ट व्हावे म्हणून अस्पृश्य बांधवांना धर्मातंर करण्याची आज्ञा केली व पुर्वीची गलिच्छ कामे बंद करण्यास सांगितली आणि शिक्षण घेवून नोकरी धंदा करावा असा संदेश दलित बांधवांना दिला. व 14 आक्टोंबर 1956 रोजी आपल्या लाखो अनुयायासह नागपूर येथील ऐतिहासिक समारंभात बौध्द धर्माची दिक्षा घतली. उंडाळे गावा जवळील घोगाव येथील दलित समाजानेही बौध्द धर्माची दिक्षा घेतली. या कारणा वरुन तेथील सवर्ण मंडळीनी अस्पृश्य बांधवावर बहिष्कार टाकला. या बहिष्काराच्या काळात अस्पृश्य बांधव हतबल झाले. सर्व बाजुनी त्यांची कोंडी केली. अशा परिस्थितीत या अस्पृश्य बांधवंनी दादांच्याकडे धाव घेतली व दादांना सर्व वस्तुस्थिती समजावून सांगितली. त्यावेळी दादांनी या अस्पृश्य बांधवांना धीर दिला. व स्वतःच्या घरातील सहा पोती ज्वारी व दोन पोती मिरच्या देवून सांगितले की " "यावर कसेतरी आठ दिवस काढा" दादांचे हे औदार्य पाहून हरिजन बांधवांच्या डोळयातून अश्रू वाहू लागले. या घटनेमुळे दादा बेचैन झाले. त्यांचे क्रांतीकारी मन सामाजिक

अन्यायाच्या शृंखला तोडण्यासाठी पुढे सरसावले. दादा ताबडतोब घोगावला आले. तेथे त्यांनी सवर्ण हिंदूची बैठक बोलाविली व या बैठकीत दादा म्हणतात की " हे सामाजिक विष्मतेचे जोखड समाजाच्या मानेवर ठेवण्याचा तुम्हाला कोण्तच नैतिक अधिकार नाही." 3 दादांनी असे खडसाविल्यानंतर सवर्ण हिंदूनी दलित समाजावर टाकलेला बहिष्कार मागे घेतला. यानंतर दादांनी उंडाळे परिसरातील इतर गावांनाही भेटी देऊन धर्मांतरानंतरचा दलित समाजावरील बहिष्कार दूर करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. दादांची ही मानवतेची आणि पुरोगामी स्वरुपाची विचारसरणी उंजाळे परिसरातील दलित समाजाच्या स्मरणातून कधीही जाणार नाही. हजारे वर्षाच्या गुलामगिरी विरुध्द आवाज उठवून ती नष्ट करण्याचे महान कार्य दादांनी केले आहे.

दादांनी सन 1940 पासून म्हणजे स्वातंत्र्य पूर्व काळात हरिजन व सवर्ण यांना एकत्र आणून अनेक वेळा सामुदायिक सहभोजनाचा सोहळा घडवून आणला होता. तसेच केवळ सहभोजने न करता ते स्वतः हरिजनाच्या घरी जाऊन जेवत असत असे समजते. दादांनी आपल्या घरी आलेल्या दलित बांधवांना कधीही विन्मुख परत पाठविले नाही. त्यांना कधी आर्थिक तर कधी धान्य रुपाने सढळ हाताने मदत केली. 4 थोडक्यात स्पृश्य–अस्पृश्य हा भेद दादांच्या मनाला कधी शिवला नाही. दलितांना आपल्या घरी आश्रय देणा–या दादांच्या औदार्याची स्मृती दलितांच्या अंतःकरणात कायमची घर करुन राहिलेली होती असे म्हणता येईल. पुरोगामी सुधारणांचा साधा वाराही ज्या उंडाळयासारख्या गावाला पोचला नव्हता त्या ठिकाणी दादा हरिजनांना आपल्या पंक्तीला बसवून जेवण देत–घेत होते. हरिजनांचा स्पर्श किंवा सावली पडली तरी पाप समजले जात होते. अशा काळात दादांनी हा बंडखोरपणा करुन दाखविला आहे. माणसाला माणूसकीपासून वंचित करणा–या आणिं त्याच्या कर्तृत्वाला पांगळे बनविणा–या या जीवघेण्या रुढी विरुध्द दादांनी दाखविलेली ही

बंडखोर वृत्ती खरोखर कौतुकास्पद आहे.

## 2. दादांचे शैक्षणिक कार्य

19 व्या शतकात महाराष्ट्रातील बहूजन समाज हा अज्ञानी, अंधश्रध्दा व अप्रगत अवस्थेचे जीवन जगत होता. याचे मुख्य कारण म्हणजे बहुजन समाजाला शिक्षण मिळालेले नव्हते. शिक्षणा शिवाय बहुजन समाजाची स्थिती सुधारणार नाही हे प्रथम म. फुल्यांनी ओळखले त्यासाठी त्यांनी शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यांच्या नंतर महर्षि धोंडो केशव कर्वे कर्मवीर भाऊराव पाटील या शिक्षणसुधारकांनी शिक्षणाची गंगोत्री बहुजन समाजापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. त्यांचेच कार्य दादासाहेबांनी पुढे चालविण्याचा प्रयत्न केला. दादांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटलांच्या शैक्षणिक कार्याचा फार मोठा प्रभाव पडल्याचे दिसून येतो. दादांचे शैक्षणिक कार्य पुढील प्रमाणे सांगता येईल.

ओंड पासून येवती पर्यंतच्या उंडाळे परिसरात 30 ते 35 गावे आहेत. 1953 साली या परिसरात माध्यमिक शिक्षण घेण्याची सोय नव्हती. श्रीमंताची मुले तालुक्याच्या आणि इतर ठिकाणी हायस्कूलच्या शिक्षणासाठी जात असत. परंतु गोर–गरीबांच्या मुलांना हे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांना हायस्कुलच्या शिक्षणास मुकावे लागत होते. गरीबांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवून आणावयाची असेल तर त्यांना शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. हे दादांनी ओळखले. व त्यासाठी दादांनी 1954 साली उंडाळे या ठिकाणी इंग्रजी शाळा (हायस्कूल) सुरु केली. 5 ही शाळा सुरु करत असताना दादांना अनेक अडचणींना तोंड दयावे लागले. केवळ हायस्कूल सुरु करुन

दादा थांबले नाहीत तर हायस्कुल बरोबर वसतीगृह सुध्दा सुरु करुन गरीब आणिं होतकरुन विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय केली. ही शाळा स्थापन करताना दादांनी स्वतः प्रत्येकाच्या घरी जाऊन वर्गणी गोळा केली. शाळासुरु झाली तर ती भरावयाची कोठे हा प्रश्न होताच. तेव्हा शाळेसाठी इमारत बांधण्याचे ठरले. तयासाठी पैसा हवा होता. दादांनी लोकांना मदत मागितली. ज्यांची आर्थीक परस्थिती बरी होती त्यांनी आर्थिक मदत केली. ज्यांचे जवळ पैसा नव्हता. त्यांनी शाळेच्या इमारतीवर श्रमदान केले व अशा प्रकारे शाळेची इमारत पुर्ण केली. या हायस्कूलमध्ये अनेक गरीब विद्यार्थ्यांना पुढे महाविद्यालयाचेही शिक्षण घेता आले.

दादांचे आणखी एक शैक्षणिक कार्य म्हणजे त्यांनी सढळ हाताने गोर–गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली. त्यांच्या आर्थिक मदतीमुळेच अनंक हुशार–होतकरु विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता आले. 6 दादांच्या आर्थिक मदतीने उच्च शिक्षण घेऊन मोठया आधिकार पदावर आरुढ झालेल्या अनेक व्यक्ती आज उंडाळे परिसरात दिसून येतात.

## दादांचे शैक्षणिक तत्वज्ञान

देशाच्या प्रगतीसाठी उत्तम शेती व उत्तम शिंक्षण यांची नितांत गरज असल्यांचे दादांनी अनेक वेळा बोलून दाखविले होते असे समजते. शेती म्हणजे शिक्षणाने मागासलेल्यांचा व्यवसाय अशी जी समजूत होती ती चुकीची असल्याचे सांगून शेतीत जाणकार मंडळीनी लक्ष घालून उत्तम शेती करुन उत्पादन वाढविले पाहिजे ह्या विचाराचा दादांनी प्रचार केला व तसा स्वतः आचार केला.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY

शिक्षणाचा सर्वत्र प्रचार झाला पाहिजे. आमचे विद्यार्थी ज्ञानाच क्षेत्रात आघाडीवर असले पाहिजेत अशी दादांची धारणा होती. नुसते "लि–वा–ही" चे लिहणे – वाचणे – हिशेब ठेवणे एवढेच मामुली शिक्षण उपयोगी इरणार नाही. तर अक्षरा – अक्षरापाटीमागे असलेला अर्थ जाणन्याची कुवत विद्यार्थ्यात आली पाहिजे असे ते म्हणत. शिक्षण हे कसदार असले पाहिजे. ते कर्मवीर भाऊराव पाटील यानी सुरु केलेल्या **"कमवा आणि शिका"** या योजने प्रमाणे असावे. दादा म्हणत **"घाम गाळा : शिका शाळा"** श्रमाची प्रतिष्ठा विद्यार्थ्यांना समजली पाहिजे असे त्यांना वाटे. 7 सर्व भारतभर एकात्र व समान पातळीवर विचार संपन्न नागरिक तयार होतील अशा प्रकारच्या व देश बलवान करणा–या शिक्षण क्रमाची आखणी केली पाहिजे असे दादांचे ठाम मत होते. खेडयापाडयातही गुणी विद्यार्थी असतात. त्याच्या गुणांचे चीज झाले पाहिजे. देश मोठा करण्यासाठी ज्ञानाच्या क्षेत्रात कर्जबाजारी करुन सेवेच्या क्षेत्रात निरलसपर्णे कार्य केले पाहिजे म्हणून दादा तळमळीने प्रयत्न करीत असत. या कार्यात त्यांना अनेक मित्र लाभले. त्यांनी ज्यांना आपले म्हंटले त्यांच्याशी ते जीवा–भावाने वागले. अनेकांना त्यांनी मदतीचा हात दिला.

## 3 दादांचे हुंडाबंदीचे कार्य

विवाह हा एक पवित्र संस्कार आहे. दोन आत्म्यांचे पवित्र मिलन म्हणजे विवाह. परंतू आज आपल्या समाजात विवाह हा संस्कार राहिलेला नाही. तर तो आर्थिक व्यवहार बनलेला आहे. मुलाच्या संगोपन – शिक्षणापासून त्याच्या खाण्या–पिण्या पर्यंतचा सारा खर्च पै–पै नी वधू पित्याकडून वसूल करण्याची प्रथा आज–काल दिसून

येते. मुलीच्या खर्चाकडे सोयीस्कर कानाडोळा करुन हुंडयाच्या रुपाने पोट बांधून उभा केलेला संसार ओरबाडून घेण्याची आसूरी लालसा वर पित्याच्या ठिकाणी आजही दिसून येते. मरणापेक्षा याचे दुःख अधिक जहरी असते.

हुंडयाची ही अमानुष च दुष्ट प्रथा मोडण्यासाठी आज तोफा डागलेल्या आपवास आज दिसत असल्या तरी दादानीही या प्रथे विरुध्द आवाज उठविल्याचे दिसून येते. हुंडाबंदी व्हावी म्हणून त्यानी आपल्या परिसरात मोलाचे काम केलेले आहे. या बाबतीत त्यांची भूमिका नेहमीच मुलीच्या बाजूकडे झुकलेली असल्याचे दिसून येते. वधु पित्याला नागविण्याचा हा अमानुष प्रकार कोणत्या व्यवहारात बसतो." असा प्रश्न विचारुन ते समाजातच चर्चा करीत. 8 ही प्रथा कशी अनिष्ट व क्रूर आहे हे पटवून देत. कोणत्या आधाराने वधूपित्याला आपण नागवितो? आपल्या पुत्राला जनावराप्रमाणे विकून मिळविलेला पैसा पापत्मक आहे. सून म्हणून घरात आणाणा–या मुलीच्या जीवनाची, तिच्या माता–पित्याच्या जीवनाची दारुण शोकांतिका करणे कोणत्याही नियमात बसणारे नाही हे दादांनी दाखवून दिले.

दादांनी हुंडाबंदीवर केवळ व्याख्याने दिली नाहीत तर समाजात हुंडाबंदीचा धडाडीने प्रसार केला. आणि स्वतःच्या मुलांच्या लग्नाच्या वेळी त्याप्रमाणे कृती करुन समाजापूढे एक वेगळाच आदर्श ठेवला. त्यांनी आपल्या चारही मुलांची लग्ने गांधी विवाह पध्दतीने केली. वास्तविक लग्नामध्ये मोठा हुंडा घेऊन आतिषबाजी करणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाई. त्यांचे पाटील घराणेही मराठा समाजातील एक अतिशय प्रतिष्ठेचे घराणे मानले जात होते. आर्थिक दृष्टीने देखिल त्यांची परिस्थिती पुष्कळच चांगली होती. असे असताना देखिल त्यांनी त्यांचे सर्वात मोठे चिरंजीव श्री. शामराव

पाटील जे अतिशय कुशल संघटक व स्वातंत्र्य सैनिकही होते. त्यांचा विवाह दादांनी 1942 साली अतिशय साध्या पध्दतीने केला. त्यांचे दुसरे चिरंजिव श्री. दिनकरराव पाटील यांचे लग्नही त्यांनी 1959 साली अतिशय साधेपणाने केले. 9 आपल्या सर्व मुलांची लग्ने दादांनी अतिशय साधेपणाने करुन समाजापुढे नवा आदर्श उभा केला हे जगजाहिर आहे.

**4. 1948 ची ब्राम्हणविरोधी दंगल थांबविण्यासाठी केलेले प्रयत्न**

1948 साली राष्ट्रपिता महात्मा गांधीचा नथूराम गोडसे नावाच्या इसमाने वध केला. त्यामुळे महाराष्ट्रात ठिक-ठिकाणी ब्राम्हण समाजा विरुध्द उद्रेक झाला. ब्राम्हणांची घरे-दारे जाळणे. त्यांना मारहाण करणे असे प्रकार खेडया-पाडयात सुरु झाले. या निमित्ताने क्षीण होत गेलेला ब्राम्हण - ब्राम्हणेत्तर वाद पुन्हा जोराने उफाळून वर आला. अनेक निरपराध ब्राम्हणांची घरे उध्वस्त होवू लागली. उंडाळे परिसरही याला उपवाद नव्हता.

अशा वेळी दादा पुढे आले. त्यांनी समाजापुढे असे म्हणने मांडले की "ब्राम्हणांची घरे जाळून हा वाद मिटणार नाही. त्यांचे संसार उध्वस्त करुन आपला कोणताच फायदा होणार नाही." 10

समाजाची एकी आणि प्रगती साधण्यासाठी माणूस प्रेमानेच बदलता येतो. हे गृहित धरुनच दादांनी उंडाळे परिसरातील ब्राम्हण विरोधी दंगली थांबविल्या. दादांची दृष्टी आणि कार्य करण्याची पध्दती कशी दुरगामी होती हेच यातून दिसून येते. बुध्दीजीवी वर्ग आणि कष्टकरी वर्ग हे एकत्र आल्याशिंवाय समाजाचा सर्वांगिण विकास

होणार नाही या विचाराची जणू ही कृती प्रतिक होती. जुने वाद, जुने वैर आणि जीवनास करकचून आवळणारे दुराग्रह आपण गाडून टाकल्याखेरीज माणसाला माणसाचे जीवन जगताच येणार नाही अशी त्यांची दृढ श्रध्दा या कृतीतून दिसून येते. एक आब्राम्हण शेतकीरी नेता ब्राम्हणांच्या घराची आग विझविण्यात जनतेला प्रक्षुब्ध करण्या ऐवजी परावृत्त करतो यात त्यांच्या दृष्टेपणाचे, समाज हिताचे, माणसावरील गाढ प्रीतीचे आणिं माणूसकीचेच दर्शन आपणास दिसून येते. **11**

## 5. लोकांच्यातील भांडण–तंटे आप–आपसात मिटविले

दादासाहेब उंडाळकरांचे हे सामाजिक कार्य अतिशय महत्वाचे आहे. त्यांनी उंडाळे परिसरातील लोकांच्यातील आप–आपसातील भांडण–तंटे सामोपचाराने मिटविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्या दृष्टीने उंडाळे परिसरात दादा हे सरन्यायाधिशच होते असे दिसून येते.

उंडाळे विभागात जी 30–35 गावे आहेत या गावातील झगडे दादांच्याकडे येत असत. दादा गटाच्या लोकांना मध्यस्थ म्हणून मान्य असत. दादांनी दिलेले निकाल दोन्ही गटाच्या लोकांना मान्य असत. त्यांच्याकडे आल्यानंतर कोणत्याही प्रकारचे वाद सामोपचाराने मिटले जात असत. अशा प्रकारे उंडाळे हे या विभागातील न्यायमंदिरच बनले होते. दादा या न्यायमंदिराचे न्यायमुर्ती होते. दादांच्या मध्यस्तीमुळे अनेक फौजदारी व दिवाणी झगडे सामोपचाराने मिटले गेले. **12**

## 6. कुस्ती कलेला प्रोस्ताहन

दादासाहेबानी उंडाळे परिसरात जे महत्वपुर्ण सामाजिक कार्य केले त्यात कुस्ती

कुस्ती कलेला दिलेले प्रोस्ताहन हे देखिल त्यांचे महत्वपूर्ण कार्य आहे. या कार्यात छ.शाहू महाराजांकडून त्यांना प्रेरणा मिळाली असावी.

उंडाळे गावची गणपतीची यात्रा मोठी भरत असे. या यात्रेतील कुस्त्याचा फड म्हणजे कराड तालुक्यातील लोकांचे प्रमुख आकर्षन असावयाचे. या फडात नामांकित पैलवानांच्या कुस्त्या होत असत. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील अनेक नामांकित पैलवान येथे जमत असत. येथील सर्व कुस्त्या निकाली होत असत. संपुर्ण फडाचे नियमन जबरदस्त व्यक्तीमत्व असलेले दादासाहेब उंडाळकर करीत असत. तसेच विजयी मल्लाना शाबासकीही देत असत. 13

7. **सर्वसामान्य शेतक-यांना, कार्यकर्त्यांना मदतीचा हात**

खेडयातील जनतेचे नेतृत्व केवळ बौध्दिक पांडित्य किंवा प्रभारी प्रचार यातून करता येत नाही. लादलेले नेतृत्वही फार काळ ठिकत नसते. काटेरी कुंपणावर फेकलेल्या निरुपयोगी जीर्ण चिंधीसमान कानात मंत्र सांगता येत नाही. 14 दादांनी समाजमनाची ही नाडी ओळखली होती. दुःख, दैन्य आणि दारिद्रयामुळे सामान्य माणसाच्या गळयात अडकलेला वेदनेचा हुंदका जो मानवतेच्या आधिष्ठानावरुन ममतेने दुर करतो त्यालाच खेडयातील जनतेचे नेतृत्व करता येते. दादांनी या मार्गाने नेतृत्व केले.

उंडाळे परिसरातील अडल्या–नडल्या शेतक–यांच्या, शेतमजुरांच्या अडचणी दादांनी दुर केल्या. तसेच पक्षीय विचार न करता कार्यकर्त्यांच्या अडचणी स्वतः आर्थिक झाळ सोसून दुर केल्या होत्या. त्यांच्या फाटक्या संसाराला हातभार लावला. 15

थोडक्यात अडचण आली असता हक्काने ज्याच्या घरापुढे उभे रहावे असा दिलासा दादांनी गरीब शेतक–याच्या, शेतमजूरांच्या व कार्यकर्त्यांच्या ठायी उत्पन्न केला.

सत्ता आणि प्रतिष्ठ यांच्या आधारे दादांनी आपला संसार सुधारला नव्हता, तर ज्यांचा संसार उधहलेला होता त्यांना उभा करुन देण्यात हातभार लावलेला होता. समाज जीवणातील कोणत्याही प्रतिष्ठीत पदाचा स्वार्थासाठी दुरुपयोग न करता किंवा त्या आधारे चार पैसे मिळविण्यापेक्षा पदरचे चार पैसे त्यांनी या उपेक्षितासाठी, गरीबांसाठी आनंदाने खर्च केलेले होते. त्यांनी "घेण्यापेक्षा देण्यातील सुख मोठे मानले. भोगापेक्षा त्यागाचा आनंद उपभोगला म्हणून त्यांच्या शब्दाला वजन होते. मान होता. 16

दादांनी शिक्षणासाठी कुचबलेल्या कुठल्याच सामान्य तरुणाला कधीच पस्त विन्मुख पाठविले नाही. उपासपोटी गावक–याला कणगुल्यातला दाणागोटा उचलून देताना कधीच अनमान केला नाही. जग सुधारत चाललय त्याच्याबरोबर माणूसाच्च दौडला पाहिजे हे त्यांनी 1930 सालीच हेरल होतं. कुठ राजकीय तडफ असलेला तरुण दिसला तर त्याला प्रोत्साहन दे, कुठ शिक्षणासाठी तळमळणारा जीव दिसला तर त्याला धना–मनाची साथ दे, कुठ शेतीसाठी नडलेला शेतकरी दिसला तर त्याला अवजारे – बियाणे दे. जिथ–जिथं माणूस तुंबला तिथं दादांनी मुकपणे त्याचा तुंब निखळून काढला. **17**

अशा प्रकारे दादांनी गरजू शेतक–यांना, कामक–यांना, कार्यकर्त्यांना मदत देऊन समाजातील लोकांच्या समोर एक वेगळाच आदर्श निर्माण केला असे म्हणता येईल.

## समारोप

दादासाहेब उंडाळकरांचे राजकीय, स्वातंत्र्य चळवळीतील कार्य जसे महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे दादांनी सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य देखिल महत्वाचे आहे. उंडाळे आणि उंडाळे परिसरात त्यांनी अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या आणि या सुधारणा त्यांनी स्वतःपासून केलेल्या आहेत. नुसतेच **"लोका सांगे ब्रम्हज्ञान, आपण कोरडे पाषाण"** या म्हणीप्रमाणे ते वागले नाहीत. तर स्वतःपासून सामाजिक कार्याचा प्रसार केला. मग ते अस्पृश्यता निवारणासंबंधीचे कार्य असो, शिक्षण क्षेत्रातील कार्य असो, अगर हुंडाबंदीचे कार्य असो. या दृष्टीने ते महात्मा फुल्यांचे सच्चे अनुयायी होते हे त्यांनी केलेल्या सामाजिक कार्यावरुन दिसून येते.

## संदर्भ


1. डॉ. मंगुडकर मा.प.
   ध्येयवादी स्वातंत्र्य सेनानी – दादा उंडाळकर
   संपादक – विठ्ठल पाटील, डॉ. कन्हैया कुंदप
   क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे पृ.क्र.26

2. माने वाय. डी.
   दीन – दुबळयांचे कैवारी – दादा
   स्वा. दादा उंडाळकर स्मारक स्मरणिका – 1976

3. तद्वत

4. ढेरे तुकाराम ज्योती
   अस्पृश्योध्दारक दादा
   दादा उंडाळकर स्मारक स्मरणिका – 1976

5. माने वाय. डी.
   दीन – दुबळयांचे कैवारी – दादा
   स्वा. दादा उंडाळकर स्मारक स्मरणिका – 1976

6. प्राचार्य थोरात प. ता.
   मुलाखत दि. 26.5.94 ठिकाण – कराड

7. कुलकर्णी अनंतराव,
   देशप्रेमी समाजसेवक

स्वा. दादा उंडाळकर स्मारक स्मरणिका – 1976

8. डॉ. भोसले द. ता.

अेक स्वप्नवेड्या दृष्टा पुरुष

स्वा. दादा उंडाळकर स्मारक स्मरणिका – 1976

9. डॉ. मंगुडकर मा. प.

ध्येयवादी स्वातंत्र्य सेनानी दादा उंडाळकर

संपादक – विठ्ठल पाटील, डॉ. कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे पृ. 30

10. डॉ. भोसले द. ता.

अेक स्वप्नवेड्या दृष्टा पुरुष

स्वा. दादा उंडाळकर स्मारक स्मरणिका – 1976

11. कित्ता

12. मांने वाय. डी.

दीन–दुबळयांचे कैवारी – दादा

स्वा. दादा उंडाळकर स्मारक स्मरणिका – 1976

13. नावलीकर सदाशिव गोपाळ, स्वातंत्र्य सैनिक

मुलाखत दि. 20.5.94 ठिकाण – कराड

14. डॉ. भोसले द. ता.

अेक स्वप्नवेळा दृष्टा–पुरुष

स्वा. दादा उंडाळकर स्मारक स्मरणिका – 1976

15. प्राचार्य थोरात प. ता.

मुलाखत दि. 26.5.94 ठिकाण – कराड

16. डॉ. भोसले द. ता.

अेक स्वप्नवेडा दृष्टा–पुरुष

स्वा. दादा उंडाळकर स्मारक स्मरणिका – 1976

17. पाटील दिनकरराव बाळकृष्ण

कल्पवृक्ष आम्हासाठी लावूनिया दादा गेले ।

संपादक – विठ्ठल पाटील, डॉ. कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे पृ. 23

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR